Shri Vile Parle Kelavani Mandal's
MITHIBAI COLLEGE OF ARTS, CHAUHAN INSTITUTE OF SCIENCE &
AMRUTBEN JIVANLAL COLLEGE OF COMMERCE AND ECONOMICS
(AUTONOMOUS)
NAAC Reaccredited 'A' Grade, CGPA:3.57 (February 2016 to December 2023)
Granted under RUSA for Enhancing Quality & Excellence in select Autonomous Colleges
Granted under FIST-DST & Star College Scheme of DBT, Government of India
Best College (2016–17), University of Mumbai

O/W No. 1590

Date: - 01.10.2024

# NOTICE

## Scholarship to Meritorious Students of Open category for Studying Abroad For the Academic Year 2024-2025

Students who wish to apply for the above scholarship scheme are required to fill ONLINE Scholarship form and submit all the requirement documents on https://fs.maharashtra.gov.in **on or before 03.10.2024**. For Physical documents verification student have to contact Joint Director, Higher Education Mumbai Region, Elphiston Technical School premises, 3, Mahapalika Marg, Dhobi Talao, Chhatrapati Shivaji Terminus Area, Fort, Mumbai, Maharashtra 400001 **on or before 05.10.2024 upto 2.00pm.**

Terms and canditions of this scheme, eligibility, age limit, educational qualification, available benefits for this scholarships and selection are available at on https://fs.maharashtra.gov.in

KDesai
Prof. Krutika B. Desai
Principal

महाराष्ट्र शासन
सहसंचालक, उच्च शिक्षण, मुंबई विभाग, मुंबई
एल्फिन्स्टन तंत्र शिक्षण विद्यालय आवार, महापालिका मार्ग, मुंबई - ४०० ००१
Email : jdhemumbai@gmail.com फोन व फॅक्स क्र. ०२२-२२६५५५००

जा.क्र. सहसं/उशि/शि-परदेशी शिष्यवृत्ती /२०२४/ दिनांक :

ई-मेलद्वारे/तात्काळ कार्यवाहीसाठी

प्रति,

१. संचालक / प्राचार्य,
सर्व शासकीय व अशासकीय अनुदानित, विना अनुदानित,
कायम विनाअनुदानित महाविद्यालये, मुंबई विभाग.
२. कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई - ४०० ०३२.
३. कुलसचिव, एस.एन.डी.टी.महिला विद्यापीठ,
चर्चगेट, मुंबई - ४०० ०२०.
४. कुलसचिव, महाराष्ट्र विधी विद्यापीठ, मुंबई.

विषय : उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत खुल्या प्रवर्गातील "गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती " या योजनेंतर्गत सन २०२४-२५ करिता टप्पा २ अंतर्गत ( Phase-२) विद्यार्थ्यांनी अर्ज भरण्याबाबत.

संदर्भ : क्र.उशिसं/शिष्य-परदेशी शिष्य/२०२४/ई-७०३८५३ दि.२७.०९.२०२४ रोजीचे पत्र.

उपरोक्त विषय व संदर्भिय पत्राच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येत की, उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत खुल्या प्रवर्गातील गुणवंत विद्यार्थ्यांनी सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात पदव्युत्तर पदवी, पदव्युत्तर पदविका व पीएच.डी अभ्यासक्रमासाठी परदेशातील शैक्षणिक संस्थेमध्ये प्रवेश घेतला असेल अशा विद्यार्थ्यांकरिता "गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती या योजनेअंतर्गत सन २०२४-२५ करिता पात्र उमेदवारांकडून शिष्यवृत्ती निवडीसाठी संकेतस्थळावर ONLINE पद्धतीने अर्ज मागविण्याची प्रक्रिया टप्पा १ द्वारे ( Phase १) पूर्ण करण्यात आलेली आहे. आता पुनःश्च विद्यार्थ्यांकडून अर्ज प्रक्रिया टप्पा २ अंतर्गत (Phase २) अटीप्रमाणे अर्ज मागविण्यात येत आहे.

https://fs.maharashtra.gov.in या संकेतस्थळावरून सविस्तर अटी व शर्ती, पात्रता, वयमर्यादा, शैक्षणिक अर्हता, मिळणारे लाभ, निवड कार्यपद्धती, सुधारित वेळापत्रक इत्यादी प्राप्त करण्यात यावी.

इच्छुक उमेदवारोनी https://fs.maharashtra.gov.in या संकेतस्थळावरून ONLINE पद्धतीने दि. २७.०९.२०२४ ते ०३.१०.२०२४ पर्यंत अर्ज भरावा. ONLINE पद्धतीन भरलेल्या अर्जाची प्रत, मूळ प्रमाणपत्रे, त्यांच्या साक्षांकित प्रतिसह पडताळणीसाठी या कार्यालयात दि.२८.०९.२०२४ ते ०५.१०.२०२४ रोजी ( सायंकाळी ६.१५ वा.) पर्यंत सादर करावीत.

तरी , आपणांस कळविण्यात येते की, सदर योजनेचा लाभ अधिकाधिक विद्यार्थ्यांनी घेण्याच्या दृष्टीकोनातून या योजनेच्या मुदतवाढीबाबत आपल्या महाविद्यालयांतील सर्व विद्यार्थ्यांना कळविण्यात यावे.

( डॉ. रुपेश राऊत )
सहसंचालक
उच्च शिक्षण, मुंबई विभाग, मुंबई

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य
३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४८६/४५९/४२१
ई-मेल—desk१८@dtemaharashtra.gov.in वेबसाईट: https://dte.maharashtra.gov.in

क्रमांक: १८/तंशिसं/परदेशी शिष्यवृत्ती/२०२४/३८२ दिनांक: २६/०९/२०२४

**उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत खुल्या प्रवर्गातील "गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती" या योजनेअंतर्गत सन २०२४-२५ करिता टप्पा २ अंतर्गत (Phase -२) विद्यार्थ्यांनी अर्ज करण्याबाबत....**

महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत महाराष्ट्र राज्यातील खुल्या प्रवर्गातील ज्या गुणवंत विद्यार्थ्यांनी सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात पदव्युत्तर पदविका, पदव्युत्तर पदवी व पीएच.डी अभ्यासक्रमासाठी, परदेशातील शैक्षणिक संस्थेमध्ये प्रवेश घेतला असेल, अशा विद्यार्थ्यांकरीता "गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती" या योजनेअंतर्गत सन २०२४-२५ करिता योजना राबविण्यांत येत आहे. या योजनेंतर्गत पात्र उमेदवारांकडून शैक्षणिक वर्ष २०२४-२५ साठी Online पध्दतीने अर्ज मागविण्याची प्रक्रिया टप्पा १ द्वारे (Phase -१) पूर्ण करण्यात आली आहे. आता पुनःश्च खालील वेळापत्रकानुसार विद्यार्थ्यांकडून अर्ज प्रक्रिया टप्पा २ अंतर्गत (Phase -२) खालील अटीप्रमाणे अर्ज मागविण्यात येत आहे.

या शिष्यवृत्तीच्या टप्पा २ (Phase -२) अंतर्गत **एकूण १४ रिक्त जागांसाठी उपरोक्त योजनेअंतर्गत** शिष्यवृत्तींसाठीचे अर्ज मागविण्यात येत आहे.

**सदर शिष्यवृत्तीसाठी पात्रतेचे निकष व योजने संबंधीच्या सखोल माहितीकरीता संकेत स्थळ:**

- https://fs.maharashtra.gov.in या संकेतस्थळावरून सविस्तर अटी व शर्ती, पात्रता, वयोमर्यादा, शैक्षणिक अर्हता, मिळणारे लाभ, निवड कार्यपध्दती, सुधारित वेळापत्रक इत्यादी माहिती प्राप्त करण्यात यावी.

इच्छुक उमेदवारांनी https://fs.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर online पद्धतीने अर्ज भरावा व online भरलेल्या अर्जाची प्रत, मूळ प्रमाणपत्रे / कागदपत्रे त्यांच्या साक्षांकित प्रतींसह पडताळणीसाठी संबंधित विभागीय कार्यालयात खालील वेळापत्रकानुसार सादर करावीत.

| क्र. | कार्यक्रम | कालावधी |
|---|---|---|
| १ | संकेतस्थळावर online पद्धतीने अर्ज भरणे व आवश्यक प्रमाणपत्रे व कागदपत्रे अर्जासोबत अपलोड करण्यास मुदत वाढ | २७ सप्टेंबर, २०२४ ते ०३ ऑक्टोबर २०२४ |
| २ | उमेदवारांनी खालील प्रमाणे शाखा /अभ्यासक्रम निहाय online भरलेल्या अर्जाची प्रत, मूळ प्रमाणपत्रे / कागदपत्रे त्यांच्या साक्षांकित प्रतींसह विभागीय कार्यालयात पडताळणीसाठी अर्ज सादर करण्याचा कालावधी<br>(अ) कला, वाणिज्य, विज्ञान व विधी शाखेंतर्गत येणाऱ्या अभ्यासक्रमासाठी ज्या उमेदवारांनी अर्ज केला आहे व उमेदवार वास्तव्यास असलेल्या जिल्ह्यातील संबंधित सहसंचालक, विभागीय कार्यालय, उच्च शिक्षण या ठिकाणी.<br>(ब) व्यवस्थापन, अभियांत्रिकी / वास्तुकलाशास्त्र व औषधनिर्माणशास्त्र शाखेंतर्गत येणाऱ्या अभ्यासक्रमासाठी ज्या उमेदवारांनी अर्ज केला आहे त्यांनी उमेदवार वास्तव्यास असलेल्या जिल्ह्यातील संबंधित सहसंचालक, विभागीय कार्यालय, तंत्र शिक्षण या ठिकाणी. | २८ सप्टेंबर, २०२४ ते ०५ ऑक्टोबर २०२४ (सायंकाळी ६.१५ वा. पर्यंत) |

विभागीय कार्यालये, उच्च शिक्षण आणि विभागीय कार्यालये, तंत्र शिक्षण यांची यादी वरील संकेतस्थळावरील माहिती पुस्तिकेमध्ये उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

Online अर्जाशिवाय इतर कोणत्याही पध्दतीने केलेला अर्ज विचारात घेण्यांत येणार नाही. इच्छुक उमेदवारांनी निर्धारित कालावधीत वरील प्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक आहे.

स्वा /-
(डॉ. विनोद म. मोहितकर)
संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य, मुंबई